# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of Stolen Property**

**Police Station** :- **Local Crime Branch**

**Date of Good Work done** :- **12/11/2021**

**Brief of the work done :-**

मा पोलिस अधीक्षक श्री बच्चन सिंह (IPS) यांचे मार्गदर्शनाखाली स्था. गु.शा. यांचे पथकाने पो. स्टेशन रिसोड येथे दाखल जबरी चोरी च्या गुन्हयातील आरोपिंतांचा शिताफीने शोध घेऊन 24 तासात तीन आरोपी अटक करून गुन्हयातील चोरी गेलेला मुद्देमाल हस्तगत केले.

लोकमत

तीन आरोपी जेरबंद : पाच लाखांचा मुद्देमाल हस्तगत

## जबरी चोरीचा २४ तासांत लागला छडा

लोकमत न्यूज नेटवर्क

**वाशिम :** कमी किमतीत सोने देण्याची बतावणी करून तीन अनोळखी व्यक्तींनी अभिजित गणेश धनबर व गौरव देशमुख या दोघांना मारहाण करून पाच लाखांची रक्कम लुटल्याची घटना १० नोव्हेंबरला घडली. दरम्यान, जिल्हा पोलीस अधीक्षक बच्चन सिंह यांनी तत्काळ दखल घेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक नेमले. पथकानेही कार्यतत्परता दाखवून अवघ्या २४ तासांत चोरीचा छडा लावला. तीन आरोपींना जेरबंद करण्यासह पाच लाखांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.



प्राप्त माहितीनुसार, १० नोव्हेंबरला फिर्यादी अभिजित धनबर यांनी रिसोड पोलिसांत दाखल केलेल्या तक्रारीत नमूद केले की, त्यांचा मित्र गौरव देशमुखच्या मोबाईलवर एकाने कॉल करून माझ्याजवळ अर्धा किलो सोने आहे व ते तुम्हाला पाच लाख रुपयांत देतो, अशी बतावणी केली. फायदा होणार असल्याने मी व गौरव देशमुख ठरावीक ठिकाणी पोहोचलो असता, तीन अनोळखी व्यक्तींनी काठीने मारहाण करून पाच लाख रुपये जबरीने हिसकावून घेतले व पोबारा केला. अशा तक्रारीवरून रिसोड पोलिसांनी भादंविचे कलम ३९४, ३४ अन्वये अज्ञात आरोपींवर गुन्हा दाखल केला.

दरम्यान, जिल्हा पोलीस अधीक्षक बच्चन सिंह यांनी घटनेची तत्काळ दखल घेत स्थानिक गुन्हे शाखा पोलीस निरीक्षकांना तपासाबाबत आदेश देऊन तथा विशेष पथक स्थापन करून रवाना केले. गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी आरोपी सुनील मनोहर भोसले, संजय बबन भोसले आणि राजू मनोहर भोसले या तिघांना जेरबंद केले. पोलिसी खाक्या दाखविताच आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली. त्यांच्याकडून ४ लाख ४७ हजार ५०० रुपये रोख व एक दुचाकी वाहन (किंमत ५० हजार) असा ४ लाख ९७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला. घटनेचा पुढील तपास रिसोड पोलीस करीत आहे.

Hello Washim
Page No. 1 Nov 12, 2021
Powered by: erelego.com